स.फौ.ख.क्र. ११०३/२०१७
नि.क्र. ७ वर सुरु

सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक २ यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

नाव : हरिशचंद्र रामरावजी बमनोटे
वय : ५६ वर्ष, व्यवसाय : नोकरी, ए.एस.आय., ब.न.१०२९
रा : पो.स्टे.रामटेक, जिल्हा नागपूर.

**सरतपासणी सरकारी वकील श्री.एस.जी.इंगळे साहेब यांच्यातर्फे**

. दि. १८.४.२०१७ रोजी मी पो.स्टे.कन्हान येथे सहा पोलीस उप निरीक्षक पदावर गुन्हे प्रगटीकरण पथकात प्रमुख म्हणून कर्तव्यावर होतो. त्यादिवशी सोबत पी.एस.आय. शेंडगे व स्टाफसह सरकारी वाहनाने टेकाडी परीसरात गस्तीवर होतो. गस्तीवर असतांना मुखबीरद्वारे खबर मिळाली की, टेकाडी येथे राहणारी सुरीन्द्रर कौर नावाची महिला आपल्या घरी दारूची विक्री करते.अशा माहितीवरून हजर असलेल्या दोन महिला पंचाना प्रकरणातील तपासी अमंलदार यांनी बोलविले. त्यानां रेड बाबत माहिती दिली. त्यांनी सोबत येण्यासाठी सहमती दिली. त्यानंतर आम्ही स्टाफ व पंचासह सुरिन्दर कौर यांच्या घरी गेलो असता एक महिला आम्हाला पाहून निघुन गेली. सोबत असलेल्या महिला पोलीस शिपाई यांनी तिचा पाठलाग केला पंरतु ती मिळुन आली नाही. सोबत असलेल्या महिला पंच हे त्याच परीसरात राहणा-या असल्यामुळे पळुन गेलेली महिला सुरीन्दंर कौर असल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही पंचासह घरी गेलो असता तेथे एक इसम हजर मिळाला त्यांना तपासी अमंलदार यांनी दारूबाबत कार्यवाही करण्याची माहिती दिली. या इसमाला त्याचे नाव विचारले असता त्याने आपले नाव गुरचरणसिंग असे सांगीतले. त्याच्यासमक्ष आम्ही घराची झडती घेतली असता घरातील बेडरूममध्ये लाकडी पलंगाच्याखली खरडयाच्या खोक्यात एकूण सिलबंद २९ देशी दारूच्या निपा प्रत्येकी १८० मिली. मिळून आल्या. तपासी अमंलदार यांनी पंचासमंक्ष या निपा जप्त करून पंचनामा कार्यावाही केली. त्यांनतर जप्त माल घेवुन पोलीस स्टेशनला आलो व तपासी अमंलदार यांना गुन्हा नोंद करण्यास मदत केली. सदरचा गुन्हा हेड कॉस्टेबल सुनिल फाये यांनी नोंदवुन घेतला व पुढील तपास श्री. फाये यांनी केला. तपासा दरम्यान माझे बयान नोंदविल. जी महीला आम्हाला घटनेच्या वेळी पाहून पळून गेली व जिला महिला पंचानी ओळखले ती महिला आज आरोपी म्हणून हजर आहे.

## <u>उलटतपास आरोपीतर्फे  श्री एम.एस.शर्मा वकिलसाहेब :</u>

२.	डयुटीवर रूजु होत असतांना आमची हजेरी होते तसेच त्याची नोंदसुध्दा घेतली जाते. घटनेच्या दिवशी डयुटीवर हजर असल्याबाबतचा हजेरी पटाचा उतारा अभिलेखावर दिलेला नाही. गस्तीवर जातांना स्टेशन डायरीमध्ये गस्तीकरीता निघाल्याची वेळ तसेच स्आफची माहिती दयावी लागते. तसेच गस्तीवरून परत आल्यानंतर गस्ती दरम्यान केलेल्या कार्यावाहीचा उल्लेख स्टेशन डायरीमध्ये घ्यावा लागतो.  हे म्हणने खरे आहे की, स्टेशन डायरी चा उतारा अभिलेखावर दिलेला नाही.  हे म्हणने खरे नाही की, त्यादिवशी रेड कार्यवाहीमध्य हजर नव्हतो या कारणाने स्टेशन डायरीचा उतारा अभिलेखावर दिलेला नाही.

३.	“ ***महिला पंचानी सोबत येण्यासाठी सहमती दिली***’’ हि बाब  मी माझे बयान देंताना सांगीतली होती पंरतु  तसे तपासी अमंलदार यांनी का लिहून घेतले नाही याचे कारण मी सांगु शकत नाही.“ ***महिला पोलीस शिपाई यांनी तिचा पाठलाग केला***’’ ह बाब  मी माझे बयान देंताना सांगीतली होती पंरतु  तसे तपासी अमंलदार यांनी का लिहून घेतले नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणने खरे आहे की, टेकाडी परीसरातील घटना स्ळि  हे गजबजलेले परीसर आहे तेथे लोकांची घरे आहे, सार्वजनिक रस्ते आहेत व महिला पुरूषांची  नेहमी ये-जा आहे.

४.	ज्या घरातुन रेड कार्यवाही केली त्या घराच्या मालकीबाबतचे दस्त ऐवज मी स्वत: पाहिले नाही.  हे म्हणने खरे नाही की, अशी कोणती घटना घडली नाही या कारणाने घराच्या मालकीबाबतचे दस्ताऐवज पाहिले नाही.  हे म्हणने खरे नाही की,  घ टनेच्या दिवशी रेड कार्यवाहीमध्ये नव्हतो या कारणाने घराच्या मालकीबाबतचे दस्ताऐवज मी पाहिले नाही.  हे म्हणने खरे आहे की, रेड कार्यवाही करण्यापुर्वी ज्या ठिकाणी रेड कार्यवाही करीत आहोत त्यांची पुर्व लेखी परवानगी घ्यावी लागते.  हे म्हणने खरे आहे की, गुरचरणसिंग यांची लेखी परवानगी घेतल्याबाबतचा कोणताही दस्ताऐवज अभिलेखावर दिलेला नाही.  हे म्हणने खरे नाही की, अशा प्रकारची कोणतीही घटना घडली नाही या कारणाने गुरूचरणसिंग यांची लेखी परवानगीबाबतचा दस्ताऐवज अभिलेखवर दिलेला नाही.  हे म्हणने खरे आहे की, प्रकरणात केवळ कर्मचा-यांचे बयान नोंदविले आहे. हे म्हणने खरे आहे की, देशी दारूचे वेगवेगळे प्रकार व ब्रॅन्ड असतात.  हे म्हणने खरे आहे

की, माझ्या पोलीसांना दिलेल्या बयानात देशी दारूचे प्रकार व ब्रॅन्डबाबत उल्लेख नाही. हे म्हणने खरे नाही की, माझ्यासमक्ष कुठलिही कार्यवाही झाली नाही या कारणाने देशी दारूचा प्रकार व ब्रॅन्डचा उल्लेख जबाबत नाही. माझ्याकडे दारू ओळखण्याबाबतचा कोणताही वेगळे प्ररिक्षण नाही. हे म्हणने खरे आहे की, कन्हान परीसरात देशी दारूचे दुकाने आहेत. हे म्हणने खरे नाही की, आज रोजी मी खोटे बयान देत आहे. हे म्हणने खरे नाही की, आम्हाला प्रोहिबिशनचे तसेच जुगाराबाबतचे प्रकरण महिनेवारी दाखवावे लागते. हे म्हणने खरे नाही की, प्रकरणातील तपासी अमंलदार यांच्या सहमतीने आरोपीविरूध्द खोटी केस तयार केली. हे म्हणने खरे नाही की, महिला आरोपीला आज रोजी पहिल्यांदा न्यायालयात पाहिले आहे. हे म्हणने खरे नाही की, न्यायालयात आरोपीच्या जागेवर महिला आरोपी एकटी बसली म्हणून मी ती आरोपी आहे असे सांगीतले आहे. हे म्हणने खरे नाही की, आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

श्रवणोत्तर स्विकृत

(व्हि.म.गायकवाड)
३ रे सह दि. न्या. क. स्तर, व
प्र.श्रे.न्या, कामठी
दि. २.७.२०१८

माझ्या समक्ष

(व्हि.म.गायकवाड)
३ रे सह दि. न्या. क. स्तर, व
प्र.श्रे.न्या, कामठी